24 SEP 2023

जनसंपर्क कक्ष

पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शरण साहित्य अध्यासनास लाखाचा निधी



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना आ. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांच्याकडून लाख रुपयांचा निधी सुपूर्द करताना सरलाताई पाटील.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सुरू होणाऱ्या शरण साहित्य अध्यासनाकरिता आ. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी एक लाख रुपयांचा प्रथम निधी प्रदान केला. विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये विद्यापीठात शरण साहित्य अध्यासन स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे. सदस्य अभिषेक मिठारी यांनी हा ठराव मांडला होता.

या अध्यासनाकरिता लोकवर्गणी जमा करण्याचे आवाहन लिंगायत समाज संस्थेने केले होते. त्यास प्रतिसाद देत आ. यड्रावकर यांनी प्रथम निधी देणगी स्वरूपात दिला. हा निधी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सरलाताई पाटील यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यापूर्वी एप्रिल २०२३ मध्ये शरण साहित्य अध्यासनासाठी कोल्हापूर बसव केंद्रातर्फे ११ हजार रुपयांची ग्रंथसंपदा भेट दिली आहे. निधी प्रदानप्रसंगी अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, राजशेखर तंबाके, विलास आंबोळे, सी. व्ही. चौगुले, यश आंबोळे, दत्ता घुटुकडे आदी उपस्थित होते.

24 SEP 2023
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी डॉ. उदय जोशी यांचे व्याख्यान झाले. यावेळी डावीकडून राजन पडवळ, विलास शिंदे, श्रीकृष्ण महाजन, प्रमोद पाटील, वैशाली आवाडे उपस्थित होत्या.

# सहकारी बँकिंगमध्ये दिसतील चांगले बदल

## डॉ. उदय जोशी : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : 'सहकार क्षेत्राने गेल्या काही वर्षांत अनेक चढउतार अनुभवले असले, तरी नजीकच्या कालखंडात सहकारी बँकिंग क्षेत्रासमोरील समस्या कमी होतील. आणखी चांगले बदल दिसतील,' असा आशावाद नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स ॲंड क्रेडिट सोसायटीज् लिमिटेडचे (नॅफकब) संचालक डॉ. उदय जोशी यांनी येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे लक्ष्मणराव इनामदार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'सहकारी बँकांची भविष्यातील वाटचाल' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे , महाराष्ट्र राज्य सहकारी बँक फेडरेशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे प्रमुख उपस्थित होत्या. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. जोशी म्हणाले, 'देशात बँकांच्या वाढीला मोठी संधी आहे. सहकारी बँकांचे देशातील प्रमाण अवघे तीन टक्के आहे. त्यांनाही वाढीची संधी आहे. गेल्या तीन वर्षांत आम्ही सहकारी बँकांच्यावतीने धोरण बदलासाठी म्हणून रिझर्व्ह बँकेकडे खूप रदबदली केली आहे. या बँकांवरील नियंत्रण, नियमन प्रणाली अधिक सक्षम करा, पण परवानगी द्या, असा आग्रह धरला. परिणामी, रिझर्व्ह बँकेने आता सहकारी बँकांच्या अनुषंगाने धोरणात्मक लवचिकता स्वीकारली आहे. धोरणांमध्ये बँकेने अनेक सकारात्मक बदल केल्याचे जाणवते आहे.' अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

### 'डिजिटल'च्या दिशेने जायला हवे

■ प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'सहकारी बँकांनी आधुनिकतेची कास धरीत डिजिटल सुविधा उपलब्धतेच्या दिशेने जायला हवे. रिझर्व्ह बँकेच्या या संदर्भातील धोरणांचाही संशोधनात्मक अभ्यास गरजेचा आहे.'

24 SEP 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी बँकिंगच्या समस्या कमी होतील : डॉ. जोशी

कोल्हापूर : प्रतिनिधी

सहकार क्षेत्राने गेल्या काही वर्षांत अनेक चढ-उतार अनुभवले असले तरी नजीकच्या कालखंडात सहकारी बँकिंग क्षेत्रासमोरील समस्या कमी होतील, असा आशावाद नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटी तथा 'नॅफकब'चे संचालक डॉ. उदय जोशी यांनी व्यक्त केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. उदय जोशी. सोबत अन्य.

शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने लक्ष्मणराव इनामदार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'सहकारी बँकांची भविष्यातील वाटचाल' या विषयावरील विशेष व्याख्यानात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. राज्य सहकारी बँक फेडरेशनच्या उपाध्यक्षा वैशाली आवाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचीही उपस्थिती होते. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

तरुण भारत

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्याहस्ते विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळा व मुख्य प्रशासकीय भवनातील प्रतिमेस पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. कैलास सोनावणे, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, सरलाताई पाटील, भूगोल अधिविभागाचे डॉ. एस.के. पवार, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. जे.बी. सपकाळे, डॉ. पी. टी. पाटील, डॉ. मीना पोतदार, डॉ. अभिजीत पाटील, सुनिल जाधव आदींसह संशोधक विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

लोकमत

# प्रदूषणविरहित रसायन वापरण्यावर भर

**मुलाखत**



डॉ. राहुल माने

एकीकडे प्रदूषणाची वाढती समस्या, तर दुसरीकडे सर्वच घटकांमध्ये रसायनाचा वारेमाप वापर. हे कुठेतरी टाळायचे असेल तर प्रदूषणविरहित रसायन तयार करायले हवे. जगभरातील संशोधक यावर प्रयत्न करत असून, कमीत कमी घातक रसायन तयार करून प्रदूषणाची हानी रोखण्यासाठी पावले टाकली जात असल्याचे शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्राचे डॉ. राहुल माने यांनी सांगितले. स्प्रिंजर नेचर, एल्सेवेईरच्या नियतकालिकामध्ये संशोधन लेख प्रसिद्ध व्हावा, यासाठी जगभरातील संशोधक प्रयत्नशील असतात. 'एल्सेवेईर'च्या आफ्रिकन जर्नल ऑफ केमिकल इंजिनिअरिंगच्या संपादकीय मंडळावर डॉ. माने यांची नुकतीच निवड झाली. यानिमित्ताने जगभरातील केमिकल क्षेत्रातील घडामोडी, आफ्रिकन जर्नलचे कार्य यावर ते उलगडत गेले.

**प्रश्न : आफ्रिकन जर्नलचे नेमके कार्य काय?**

येथे संशोधन लेख प्रसिद्ध होणे प्रतिष्ठेचे मानले जाते. पर्यावरणापासून ते रसायन क्षेत्रापर्यंत निगडीत विषयांमधील संशोधन लेख यांचे हे संपादकीय मंडळ अचूक निरीक्षण करते. जगभरातील वेगवेगळ्या त्या-त्या विषयातील तज्ज्ञ परीक्षकांमार्फत हे लेख तपासले जातात. या लेखामधील नवनवीन संशोधन समाजाच्या, संस्थांच्या किती उपयोगी आहे, हे पाहूनच ते प्रसिद्ध करायचे की नाही, याचा निर्णय घेतला जातो. पर्यावरण, प्रक्रिया, वर्गीकरण टेक्नॉलॉजी, खनिजे-कोळसा खाणी, मटेरियल सायन्स इत्यादी विषयांवर या जर्नलचा अधिक भर आहे.

**प्रश्न : आपल्या निवडीतून विद्यापीठाला, राज्याला काय फायदा होईल?**

या संपादकीय मंडळावर देशभरातून केवळ दोघांची निवड झाली आहे. त्यापैकी एक तज्ज्ञ आयआयटीमधील आहेत. या निवडीमुळे शिवाजी विद्यापीठाचे नाव जागतिक पातळीवर नेण्याची संधी आहे. राज्यातील, शिवाजी विद्यापीठातील जास्तीत जास्त संशोधक या जर्नलमध्ये पेपर कसे प्रसिद्ध करतील, त्यादृष्टीने माझे प्रयत्न राहतील.

**प्रश्न : सध्या केमिकल क्षेत्रात काय सुरू आहे?**

पर्यावरणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पेट्रोल-डिझेलला पर्याय देण्यासाठी केंद्र सरकारच्या स्तरावर विशेष प्रयत्न सुरू आहेत. केमिकलमुळे पर्यावरणाला हानी पोहोचू नये, यासाठी त्यातील घातकपणा कमी करून प्रदूषणविरहित रसायन बनविण्याची योजना सुरू आहे. प्रदूषणविरहित रसायनामुळे मानवासह निसर्ग, प्राणी यांनाही कमीत कमी त्रास होणार आहे.

**प्रश्न : भारतात केमिकल क्षेत्रात फारसे संशोधन झाले नाही?**

होय, हे काही अल्प प्रमाणात खरे आहे. पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत आपल्या देशात केमिकल क्षेत्रात तितकेसे संशोधन झालेले दिसून येत नाही. या संशोधनासाठी लागणाऱ्या सोयी-सुविधांचा अभाव हे त्याचे प्रमुख कारण आहे. मात्र, अलीकडच्या काळात केमिकलमधील संशोधनाकडे विद्यार्थी संशोधकांचा मोठा कल वाढला आहे. तळागाळापर्यंत हे संशोधन नेऊन समाजाला, सर्वसामान्यांना त्याचा लाभ कसा मिळेल, हे मुख्यत्त पाहिले पाहिजे.

**प्रश्न : या क्षेत्रात संधी आहेत?**

केमिकल अभ्यासक्रमांकडे मुलांचा प्रचंड ओढा आहे. या क्षेत्रात जगभरात अमर्याद संधी आहेत. नोकरीच्या क्षेत्रातील विविध संधी समोर ठेवून रसायनशास्त्रातून करिअर कसे पुढे नेता येईल, हेही विद्यार्थ्यांनी पाहणे गरजेचे आहे.

**पोपट पवार**

(लेखक कोल्हापूर लोकमतमध्ये बातमीदार आहेत)